
अपराध मीच केला
मधुसूदन कालेलकर

स्वतंत्र
सामाजिक
नाटक

●

# अपराध मीच केला !

●

मधुसूदन
कालेलकर

●

रंजना प्रकाशन
पुणे
बारावें

RAMANATH PANDIT CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH IN INDIAN THEATRE
Date..........
ESTD. 1981

प्रकाशक :
दीनानाथ
कृष्णराव
पै

०

तिसरी
आवृत्ति

०

डिसेंबर
सत्तर

०

मुखपृष्ठ :
कंटक

०

किंमत ६ रुपये

०

प्रकाशन स्थळ :
अशोक निवास, दुसरा मजला,
ब्लॉक नं. १०, सुभाष नगर,
ना. म. जोशी मार्ग, मुंबई ११.

०

मुद्रक :
वसंत वि. सरफरे

०

मुद्रण स्थळ :
प्रतिभा प्रिंटींग प्रेस,
ज्योति स्टुडीओ कंपाऊंड,
नाना चौक, मुंबई ७.

या नाटकाचा पहिला प्रयोग एक सप्टेंबर १९६४ रोजी 'भावे नाट्य मंदिर, सांगली येथें रात्रौ ९–३० वाजतां 'नाट्य–वैभव' या संस्थेनें केला. त्यांत खालील कलावंतांनीं भाग घेतला.

| | | |
|---|---|---|
| कमांडर अशोक वर्टी | : | अरुण सरनाईक |
| बाबासाहेब वागळे | : | राजा नेने |
| श्याम अजिंक्य | : | राजन |
| गोळे मास्तर | : | शरद तळवलकर |
| उपळेकर | : | वसंत ठेंगडी |
| शैला वर्टी | : | कामिनी कदम |
| रजनी अजिंक्य | : | लता थत्ते |
| संजय | : | सचिन |
| जज्ज | : | अरविंद चित्रे |
| शिरस्तेदार | : | रामभाऊ भोसले |
| गंगाराम | : | पद्माकर आठवले |
| नेव्हेल पोलिस | : | विजय राजे |
| पोलिस | : | महादेव |
| शिपाई | : | गणपत |

: लेखक :
मधुसूदन कालेलकर

: दिग्दर्शक :
श्री. आत्माराम भेंडे

: नेपथ्य :
रघुवीर तळाशीलकर

: सूत्रधार :
वसंतराव कानसे

नाट्यप्रयोगासाठी प्रमाणपत्र
डी. आर. एम./५४४/६४

परवानगीकरितां पत्रव्यवहार :—

* या नाटकाच्या भाषांतराचे, पटकथेचे, नभोवाणीचे, पुनर्मुद्रणाचे, रूपांतराचे हक्क सौ. मीना मधुसूदन कालेलकर, सी. २ ब्लॉक नं. ३ ज्ञानदेवी, साहित्य सहवास को-ऑप. हाऊ. सोसा. बांद्रा (पूर्व), मुंबई ५१ यांच्याकडे आहेत.

॥ श्री गजानन प्रसन्न ॥

## धुळीचेंच आहे मला भूषण !

रुपयाच्या अवमूल्यनाच्या या खडतर काळांत नाटकाची तिसरी आवृत्ति निघावी हें आश्चर्यच आहे. याचा अर्थ एकच ! पदरमोड करून चांगली पुस्तकें वाचण्याची संवय हल्लींच्या रसिक पिढीला लागलेली आहे ! आम्हां लेखकांना हें वरदान आहे ! तिसरी आवृत्ति काढायला लावून वाचकांनीं माझ्या प्रकाशकांना आश्चर्याचा गोड धक्काच दिला आहे. रसिकांचं प्रेम राजापूरच्या गंगेसारखं ! उफाळून आलं कीं आवरणं मुष्कील ! आणि नसेल तेव्हां पाण्याचा एक थेंब दिसणार नाहीं ! या रसिकगंगेच्या प्रवाहांत मी अनेक वेळां मनसोक्त न्हाऊन निघालों आहे ! रसिकांचं हें ऋण फेडायचं ठरवलं तरी फेडतां येणार नाहीं.

या नाटकाची ही तिसरी आवृत्ति निघत आहे आणि प्रयोगहि चतुर्थ-शतक महोत्सवाची वाटचाल करीत आहेत. नाटकाचा प्रयोग चालू असतांना प्रेक्षक जी दाद देतात, खळखळून हंसतात अगर भावनावेगानें अश्रू पुसतात तें खरं लेखकाचं बक्षीस ! हें बक्षीस मी लागोपाठ तीन वेळां मिळवलं आहे. ही हॅटट्रिक माझ्या रसिक प्रेक्षकांचीच.

शेवटी आभार मानायचे ते माझ्यावर अलोट प्रेम करणाऱ्या, माझ्या दोषावर पांघरुण घालून माझ्या फक्त गुणांचंच कौतुक करणाऱ्या माझ्या रसिक प्रेक्षकांचे व माझे प्रकाशक मित्र दीनानाथ पै यांचे हें ऋण माझ्या शिरावर सदैव रहाणार आहे एखाद्या शिरोभूषणासारखं ! या रसिक मित्रांच्या बाबतींत एकच म्हणतां येईल—

अमर्याद मित्रा तुझी थोरवी अन्  
मला ज्ञात मी एक धुलीकण।  
अलंकारण्याला परी पाय तुझे  
धुळीचेंच आहे मला भूषण ॥

—मधुसूदन कालेलकर  
५-१२-७०

सी. २, ब्लॉक ३ ज्ञानदेवी,  
साहित्य सहवास को. हा. सो.  
बांद्रा (पूर्व) मुंबई क्र. ५१

हें नाटक वाचून माझ्या पाठीवर कौतुकाची पहिली थाप मारून मला प्रोत्साहन देणारे, महाराष्ट्राचे झुंजार पत्रकार आणि अग्रगण्य साहित्यिक—

कै. आचार्य प्र. के. अत्रे

यांच्या चरणीं कृतज्ञतापूर्वक

—मधुसूदन कालेलकर

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ पडदा वर जातो आणि मलबार हिलवरील कमांडर अशोक वर्टी यांच्या बंगल्यांतील अलिशान दिवाणखाना दिसू लागतो. ]

रंगीबेरंगी फुगे आणि दिवे यांनीं दिवाणखाना सजवलेला आहे आणि त्याचं कारणहि तसंच आगळं आहे. अशोक वर्टी व त्याची पत्नी शैलजा यांच्या लग्नाचा सातवा वाढदिवस आहे. वेळ संध्याकाळची आहे. दिवाणखान्याच्या डाव्या कोपऱ्यांत वर माडीवर जाण्याचा जिना असून वर एक प्रवेशद्वार आहे. अशोक-शैलाच्या बेडरूमचे ते प्रवेशद्वार आहे. खाली जिन्यालगत डाव्या बाजूला एक दार असून स्वयंपाक घर व कोठीच्या खोलीचा तो मार्ग आहे. समोरच एक मोठा लांबट आकाराचा कॉरीडॉर आहे. त्याच्या उजव्या बाजूला मुख्य प्रवेशद्वार असून, त्याच्या उजव्या बाजूला गेस्टरूम आहे. समोरच एक रेडिओग्राम असून त्याच्यावर लाकडी बोटीचा टेबल लॅम्प आहे. बाजूला पुस्तकांचे शेल्फ असून त्यांत पुस्तके ओळीनं लावून ठेवली आहेत. दिवाणखान्याच्या डाव्या बाजूला सोफासेट असून समोर एक टीपॉय आहे. त्यावर टेलिफोन आहे. समोरील प्रवेशदारावर शैलाच्या आईचा फोटो असून फोटोला हार घातलेला आहे. बाजूला तारखेचे एक कॅलेंडर असून डाव्या बाजूला अशोक-शैलाचा पोर्ट्रेट आहे. पडदा वर जातो त्यावेळीं दिवाणखान्यांत कुणीच नसते. पण क्षणभरांत संजय, वय वर्षें ६ जिन्यावरून धांवत खाली येतो. मागोमाग नोकर गंगाराम 'छोटेसाहेब छोटेसाहेब ' म्हणत म्हणत जिन्यावरून खाली येतो.

[ संजयनें सेलर सूट घातलेला आहे ]

**गंगाराम :** असं काय करतां छोटेसाहेब ! कपडे नीट नाहीं घातले तर मम्मी मला रागावतील ना ?

**संजय :** आणि डॅडी आले कीं तुझा कान पकडतील ! [ हंसतो. ]

[ गंगाराम त्याला पकडायला येतो. पण संजय त्याला चकवतो. दिवाणखान्यांत दोघांचा शिवाशिवीचा खेळ चालतो पण संजय त्याच्या हाताला लागत नाहीं. गंगाराम दमून धापा टाकूं लागतो. ]

**गंगाराम :** ममीसाहेब आतां खाली येतील आणि तुमचा हा अवतार पाहिला कीं–

**संजय :** आधी हरलो म्हण !

**गंगाराम :** हरलो !

[ पुढे येतो. संजयचे कपडे ठीक करतो. केसांवरून कंगवा फिरवतो. ]

**गंगाराम :** आज वाढदिवस आहे तुमच्या डॅडीच्या आणि ममीच्या लग्नाचा. पाहुणे येणार आहेत–आजोबा येणार आहेत !

[ हे बोलत असतांना त्याच्या बुटाचे बंद बांधतो. ]

**संजय :** गंगाराम, लग्नाच वाढदिवस म्हणजे काय रे ?

**गंगाराम :** एवढंही माहीत नाही ! लग्नाचा वाढदिवस म्हणजे लग्न वाढतं ना. म्हणजे लग्नाचा वाढदिवस !

**संजय :** हट् ! अरे, वाढदिवस माणसाचा करतात ! पण हा लग्नाचा वाढदिवस म्हणजे–

**गंगाराम :** तुमचे डॅडी बोटीवर आहेत ना–कंडक्टर—

**संजय :** कंडक्टर नाहीं–कमांडर !

**गंगाराम :** अहो, तेच ते ! ही बोटीवरची पद्धत असली पाहिजे लग्नाच्या वाढदिवसाची !

**संजय :** पण गंगाराम तुझा वाढदिवस किती तारखेला येतो रे ?

**गंगाराम :** कुणास ठाऊक ! पण एवढं ऐकून माहिती आहे कीं ज्या दिवशीं माझा जन्म झाला त्या दिवशीं खग्रास सूर्यग्रहण होतं ! दिवसासुद्धां गुडुप अंधार होता नि लोक ओरडत होते, 'दे दान सुटे गिराण !' माझा जन्म झाला नि ग्रहण सुटलं !



**संजय :** मग तुझ्या आईला कां नाही विचारीत ?

**गंगाराम :** अहो, तोच तर घोटाळा आहे ! माझा जन्म झाल्यावर आईनं एकदां डोळे भरून माझ्याकडे पाहिलं नि डोळे मिटले ते कायमचे !

**संजय :** मी ममीला सांगेन तुझा वाढदिवस करायला. माझा वाढदिवस किती थाटांत करते ममी आणि डॅडीसुद्धां ! यावेळीं खूप फुगे लावतात, लाइट लावतात, माझ्यासाठी खूप खूप वस्तु आणतात ! आणि डॅडींच्या बोटीवरचे कॅप्टन–कमांडर येतात माझ्या वाढदिवसाला ! तो बॅटरीचा टॉरपेडो आहे ना माझ्या कपाटांत, तो कॅप्टन सैगलनी दिला ! आणि ते विमान आहे ना उडणारं–ते कमांडर चक्रवर्तींनी दिलंय ! मला सोडून कुठे कुठे जात नाहीत डॅडी–ममी त्या दिवशीं ! खूप खूप प्रेम करतात दोघं माझ्यावर !

**गंगाराम :** खोटं ! अगदीं खोटं !

**संजय :** काय खोटं ?

**गंगाराम :** डॅडीचं नि ममीचं एवढं प्रेम नाहीच तुमच्यावर !

**संजय :** कशावरून ?

**गंगाराम :** तुमच्या वाढदिवसाला, त्यांच्या लग्नाच्या वाढदिवसाला ते सर्वांना बोलावतात पण त्यांच्या लग्नाला तुम्हाला बोलावलं होतं का ?

**संजय :** [ विचार करून ] नव्हतं बोलावलं ! म्हणजे मला फसवून लग्न केलं दोघांनी !

**गंगाराम :** ही मोठी माणसं नेहमीच फसवीत असतात लहानांना !

**संजय :** आतां येवूंदे ममीला आणि डॅडींना, तुझ्यासमोर विचारतो त्यांना कीं मला लग्नाला कां नाहीं बोलावलं ते !

[ रुसून कोपऱ्यांत उभा रहातो–तोच दारांत जस्टिस बाबासाहेब (शैला)चे वडील आणि सरकारी वकील उपळेकर येतात. दोघेही डिनर सूटमध्ये आहेत. ]

**गंगाराम :** आजोबा आणि उपळेकर काका आले !